आठव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत प्रकल्प उभारणीसाठी मान्यता देण्यात आलेल्या सहकारी सूत गिरण्यांची अर्थसहाय्यासाठी निवड करण्याबाबत -
श्री संत गोरोबा शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., ता. कळंब, जि. उस्मानाबाद.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांकः सूतगि-३३१८/प्र.क्र.८/टेक्स-१ (ब)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ६ मार्च, २०१८.

संदर्भ :-

१. शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग,क्र. सूतगि-२१९३/प्र.क्र.१८६/टेक्स-१, दिनांक ११.८.१९९३.
२. शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग,क्र. सूतगि-११९४/प्र.क्र.२४३/टेक्स-१, दिनांक ०५.१२.१९९४.
३. शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि- ११९७/प्र. क्र.१९३/टेक्स-१, दिनांक २४.३.१९९९.
४. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र. सूतगि-११०८/प्र.क्र.९१/ टेक्स-१ (अ), दिनांक ३०.०६.२०११.
५. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र. सूतगि-३३१६/प्र.क्र.८१/ टेक्स-१ (अ), दिनांक १०.०७.२०१७.
६.संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे पत्र क्र.कार्या.६(१)/सूतगि/८५७/२०१८, दि.२५.०१.२०१८.

प्रस्तावना :-

आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात महाराष्ट्रातील नवीन सहकारी सूतगिरण्यांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरुन श्री. संत गोरोबा शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., कळंब, जि. उस्मानाबाद या गिरणीचा संदर्भ क्र.२ येथील दि.०५.१२.१९९४ च्या शासन निर्णयान्वये आठव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करुन खास बाब म्हणून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यास मान्यता देण्यात आली होती. याच काळात आठव्या पंचवार्षिक योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या बऱ्याचशा सहकारी सूतगिरण्यांनी उभारणीबाबत कार्यवाही सुरु करुन, प्रत्यक्ष उभारणी व उत्पादन सुरु केले. संत गोरोबा शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., कळंब, जि. उस्मानाबाद या सूतगिरणीने नोंदणी कालावधीपासून प्रकल्प उभारणीबाबत प्रगती न केल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ अन्वये संचालनालयाचे दि.३१.१०.२००६ च्या आदेशानुसार गिरणी अवसायनात काढण्यात आली. सदर आदेशाविरुध्द गिरणीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५४ अन्वये शासनाकडे पुनरिक्षण अर्ज

दाखल केला. सदर पुनरिक्षण अर्जावर सुनावणी होऊन संचालनालयाचे दि.३१.१०.२००६ चे अवसायनाचे आदेश रद्द करुन गिरणीच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ पदभार घेईपर्यंत संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता व संस्था कार्यान्वीत होण्याकरिता हंगामी समितीची नेमणूक करण्याचे आदेश दि.२७.१२.२०१७ रोजी पारित केले आहेत. सदर आदेशास अनुसरुन संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांच्या दि.१२.१.२०१८ अन्वये सूतगिरणीवर ४ हंगामी सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन सदरहू सूतगिरणीची शासकीय अर्थसहाय्यासाठी नव्याने निवड करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

श्री. संत गोरोबा शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., कळंब, जि. उस्मानाबाद या सूतगिरणीचा आठव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करुन खास बाब म्हणून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली होती. आता, सदरहू गिरणीची शासकीय अर्थसहाय्य देण्यासाठी नव्याने निवड करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन दि.११.८.१९९३, दि.२४.३.१९९९ (अट क्र.५ वगळून) व दि.१०.७.२०१७ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती आणि सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.३०.६.२०११ च्या शासन निर्णयातील तरतुदी या सूतगिरणीवर बंधनकारक राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०६१३१९१८६१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pramod D. Tupe

Digitally signed by Pramod D. Tupe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28590802f030b209e5b1d488527383f61acb2a10c00b8e9718dcbbc845a30f9b, cn=Pramod D. Tupe
Date: 2018.03.06 13:20:30 +05'30'

(प्रमोद द. तुपे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद
६. प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, औरंगाबाद.
७. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद

८. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई-२३
१०.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
११.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. अध्यक्ष, श्री. संत गोरोबा शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., कळंब, जि. उस्मानाबाद
१४. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, वकील हाऊस, मुंबई
१५. निवडनस्ती (टेक्स १-ब/(टेक्स १-अ))